| Published Date: | Thursday 11th February, 2021 | Publication: | Punya Nagari (Marathi) [Mumbai] |
|---|---|---|---|
| Journalist: | Bureau | Page No: | 4 |
| MAV/CCM: | 45,440/28 | Circulation: | 15,479 |


# अदानी इलेक्ट्रिसिटीचा ॲप्रेन्टिसशिप उपक्रम

**मुंबई** : अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई यांनी वर्सोवा टेक्निकल ट्रेनिंग सेंटरमधील डिप्लोमाधारकांसाठी १२ महिन्यांच्या कालावधीसाठी नॅशनल ॲप्रेन्टिस प्रमोशन स्कीमअंतर्गत अद्वितीय युनिक ॲप्रेन्टिसशिप ट्रेनिंग प्रोग्राम सादर केला आहे. या उपक्रमांतर्गत ऊर्जा विभागातील कार्यक्षम काम करण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य मिळवता येणार असल्याचे अदानी इलेक्ट्रिसिटीने सांगितले.

अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड अर्थात एईएमएलने पॉवर सेक्टर स्किल कौन्सिलच्या सहयोगाने भारतातील एनएपीएस स्कीमअंतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रम सादर केला आहे. हा उपक्रम ट्रिपल सर्टिफिकेशन म्हणजेच ज्युनिअर इंजिनीअर ऊर्जा वितरण, प्रशिक्षणाच्या पर्यायी व्यापाऱ्यातील पीएसएससीद्वारे प्रमाणपत्र देतो तसेच अधिकृत व्यक्ती म्हणून विद्युत यंत्रणेवर काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग पर्यवेक्षक परवाना मिळवण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या प्रमुख विद्युत निरीक्षकाने सूचित केलेल्या सर्टिफिकेशन कोर्स ऑन इलेक्ट्रिकल सेफ्टी अॅण्ड डिझाइन अस्पेक्ट ऑफ इलेक्ट्रिकल इन्स्टॉलेशनवर १२ आठवड्यांच्या कोर्सचा अभ्यासक्रम आहे.

एम/ एस अदानी इलेक्ट्रिसिटी सहभागींना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण पूर्तता प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. एईएमएलचे प्रवक्ता यांनी एनएपीएससोबत सहयोग केल्याबाबत आनंद व्यक्त केला आहे.

ऊर्जाक्षेत्रात कुशल व्यावसायिकांची मागणी आहे. त्यामुळे या कोर्सच्या माध्यमातून उद्योगांच्या गरजूंची पूर्तता होणार आहे. राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळांतर्गत पंतप्रधानांच्या स्किल इंडिया मिशन उपक्रमाला सहाय्य करणार आहे. प्रोग्राम ॲप्रेन्टिसदरम्यान चार महिने आयएलटी प्रोग्राम, नंतर आठ महिने ऑन दि जॉब प्रशिक्षण घेता येणार आहे.